**<u>ठळक बातम्या</u>**

- विकसित भारतासाठी ईशान्येकडच्या राज्यांचा विकास आवश्यक असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- जम्मू - काश्मीरच्या किरू औष्णिक उर्जाप्रकल्पातल्या घोटाळ्यात माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांच्यासह ६ जणांवर सीबीआयचं आरोपपत्र दाखल

- मिस वर्ल्ड २०२५ स्पर्धेत टॅलेंट स्पर्धेच्या अंतिम फेरीसाठी २४ प्रतिभावंत स्पर्धकांची निवड

- ISSF ज्युनिअर वर्ल्डकप नेमबाजी स्पर्धेत भारताची एक सुवर्ण, दोन रौप्य पदकांची कमाई

**आणि**

- खेलो इंडिया बीच स्पर्धेत महाराष्ट्राची ४ सुवर्ण, ४ रौप्य आणि ६ कास्य पदकं मिळवून अव्वल स्थानी झेप

**<><><><><>**

विकसित भारतासाठी ईशान्येकडच्या राज्यांचा विकास आवश्यक असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. ईशान्येकडच्या राज्यांमधे गुंतवणुकीच्या संधी उलगडून दाखवणाऱ्या उदयोन्मुख ईशान्य भारत गुंतवणूकदार परिषदेचं उद्घाटन आज प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झालं. त्यावेळी ते बोलत होते. ईशान्येकडच्या राज्यांमधे निसर्गाचं जतन आणि संवर्धन लोकपरंपरेनं केलं असून तिथलं आरोग्यदायी वातावरण गुंतवणुकदारांसाठी एक आकर्षण असल्याचं ते म्हणाले...

**होल्ड- बाईट-- प्रधानमंत्री**

ईशान्येकडच्या राज्यांमधे पायाभूत सोयीसुविधांचा विकास झाला असल्याचं ईशान्य क्षेत्र विकास विभागाचे केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी सांगितलं. या परिसरात १७ विमानतळ आणि दोन हजाराहून अधिक विमान उड्डाण सेवा उपलब्ध असल्याची माहिती त्यांनी दिली.

दोन दिवस चालणाऱ्या या परिषदेत मंत्रिस्तरीय चर्चासत्रं, बैठका, स्टार्टअप्स आणि प्रदर्शन अशा गुंतवणुकीला प्रोत्साहन देणाऱ्या कार्यक्रमांचा समावेश आहे. गुंतवणुकीला प्रोत्साहन देणाऱ्या क्षेत्रांमध्ये पर्यटन आणि आतिथ्य, कृषी-अन्न प्रक्रिया आणि संबंधित क्षेत्रे; वस्त्रोद्योग, हातमाग आणि हस्तकला, आरोग्यसेवा, शिक्षण आणि कौशल्य विकास, माहिती तंत्रज्ञान, पायाभूत सुविधा आणि दळणवळण सुविधा, ऊर्जा आणि मनोरंजन आणि क्रीडा यांचा समावेश आहे.

**<><><><>**

दहशतवादाविरोधात भारताची भूमिका स्पष्ट करण्यासाठी ऑपरेशन सिंदूर अंतर्गत, सात बहुपक्षीय प्रतिनिधिमंडळं  येत्या १५ दिवसांत ३२ वेगवेगळ्या देशांना भेटी देणार आहेत.

भारत दहशतवादी हल्ल्यांना तोंड देत असताना रशियाशी संपर्क राखणं अत्यंत महत्त्वाचं आहे. रशिया आणि भारत हे परस्परांचे धोरणात्मक भागीदार देश असून राजनैतिक मुद्दे  आणि व्यापाराबाबत कायम एकत्रितपणे काम करतात ,असं प्रतिपादन  द्रमुक खासदार **कनिमोळी करुणानिधी** यांनी **रशियाची** राजधानी मॉस्को इथं आज माध्यमांशी बोलताना केलं. **कनिमोळी करुणानिधी** यांच्या नेतृत्वाखालचं  शिष्टमंडळ आज मॉस्को इथं  पोहोचलं. हे शिष्टमंडळ यानंतर  स्पेन, ग्रीस, स्लोव्हेनिया, लाटवियाला भेट देईल.

जनता दलाचे खासदार **संजय झा** यांच्या नेतृत्वाखालचं  बहुपक्षीय शिष्टमंडळ काल **जपानला** पोहोचलं. जपानची राजधानी  टोकियो इथं  ब्राझील, ऑस्ट्रेलिया, कोलंबिया, ग्रीस आणि दक्षिण कोरियाच्या राजदूतांशी त्यांनी संवाद साधला.

**जगातल्या प्रत्येक दहशतवादी कारवाईमध्ये पाकिस्तानचा काही ना काही संबंध असल्याचं दिसून येत आहे. भारतीय नागरिकांना लक्ष्य केलं गेलं तर भारत प्रत्युत्तर दिल्याशिवाय राहणार नाही, असं संजय झा यांनी सांगितलं.** संजय झा यांनी जपानच्या माजी प्रधानमंत्र्यांशी, परराष्ट्रमंत्र्यांशी तसंच इतर उच्च पदस्थांशी चर्चा करून सर्व प्रकारच्या दहशतवादाचा मुकाबला करण्यासाठी भारत वचनबद्ध आहे, असा दृढ विश्वास व्यक्त केला.

शिवसेना खासदार **डॉ. श्रीकांत शिंदे** यांच्या नेतृत्वाखालचं आणखी एक बहुपक्षीय शिष्टमंडळ काल **अबू धाबीला** पोहोचलं. या बहुपक्षीय शिष्टमंडळानं दहशतवादाविरुद्ध भारताच्या शून्य-सहिष्णुतेच्या भूमिकेवर भर देण्यासाठी संयुक्त अरब अमिरात मधल्या उच्चाधिकाऱ्यांसोबत आणि माध्यम अधिकाऱ्यांसोबत अनेक उच्चस्तरीय बैठका घेतल्या. याचबरोबर खासदार बैजयंत पांडा, खासदार शशी थरूर आणि खासदार सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखालची इतर तीन शिष्टमंडळं उद्या, तर खासदार रविशंकर प्रसाद यांच्या नेतृत्वाखालचं शिष्टमंडळ परवा विविध देशांच्या दौऱ्यावर रवाना होणार आहे. परराष्ट्र सचिव **विक्रम मिस्री** आज संध्याकाळी बहुपक्षीय खासदार शिष्टमंडळांना त्यांच्या परदेश दौऱ्यांपूर्वी माहिती देणार आहेत.

**<><><><><>**

ऑपरेशन सिंदूरबद्दल नागरिक सेनादलांप्रति कृतज्ञतेची भावना व्यक्त करत आहेत. आता ऐकू या सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या नागरिकांनी दिलेल्या प्रतिक्रिया ….

**होल्ड बाईट -**

**<><><><><>**

जम्मू - काश्मीरचे माजी राज्यपाल सत्यपाल मलिक आणि इतर पाच जणांवर, किरू औष्णिक उर्जा प्रकल्पासंदर्भात केंद्रीय अन्वेषण संस्था सीबीआयने आरोपपत्र दाखल केलं आहे. २०२२ मध्ये, किरू जलविद्युत प्रकल्पातल्या २२०० कोटी

रुपयांच्या बांधकामाच्या कंत्राटात भ्रष्टाचारा झाल्याच्या आरोपांची चौकशी सीबीआय मार्फत करण्याची विनंती जम्मू - काश्मीर सरकारने केली होती. या प्रकरणी चिनाब व्हॅली पॉवर प्रोजेक्ट्सचे तत्कालीन अध्यक्ष नवीन कुमार चौधरी आणि इतर अधिकारी एमएस बाबू, एमके मित्तल आणि अरुण कुमार मिश्रा यांच्यासह पटेल इंजिनिअरिंग लिमिटेड यां कंपनीचा समावेश आहे. चिनाब नदीवरचा किरू जलविद्युत प्रकल्प किश्तवाड जिल्ह्यात उभारण्यात येत आहे.

<><><><><>

छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात किस्ताराम इथं नक्षलवादी आणि सुरक्षा दलात काल संध्याकाळी चकमक झाली. या चकमकीत एक नक्षलवादी मारला गेला.

<><><><><>

मिस वर्ल्ड २०२५ स्पर्धेत टॅलेंट स्पर्धेच्या अंतिम फेरीसाठी २४ प्रतिभावंत स्पर्धकांची निवड झाली. या स्पर्धेत सहभागी झालेल्या जगभरातल्या सुमारे १०० स्पर्धकांनी पारंपरिक कलाप्रकार सादर केले. यात शास्त्रीय संगीत, सुगम गीत गायन, नृत्याचा समावेश होता.

या फेरीत भारतासह अमेरिका, पोलंड, नायजेरिया, फिलिपिन्स अशा २४ देशतल्या स्पर्धकांची निवड झाली असून टॅलेंट चॅलेंजच्या अंतिम फेरीत त्या सहभागी होणार आहेत. या फेरीत विजेत्या ठरणाऱ्या स्पर्धकाला सर्वोत्तम दहामध्ये प्रवेश मिळेल.

<><><><><>

दीवच्या घोघला समुद्र किनाऱ्यावर सुरू असलेल्या खेलो इंडिया बीच स्पर्धेत ४ सुवर्ण, ४ रौप्य आणि ६ कास्य पदकांसह १४ पदकांची लयलूट करत महाराष्ट्राने प्रथम स्थानावर झेप घेतली आहे. कालच्या तिसऱ्या दिवशी ५० ते ५५किलो वजनी गटात जयश्री शेटे हिने सुवर्ण कामगिरी केली. रामचंद्र बदक आणि सचिन

गर्जे, ओंकार अभंग, वैभव काळे आणि अंशुल कांबळे यांनी आपापल्या गटात रौप्य पदकं पटकावली. कबड्डीमध्ये महिला गटात महाराष्ट्राने उपांत्य फेरीत प्रवेश केला.

<><><><><>

जर्मनी इथं सुरू असलेल्या ISSF ज्युनिअर वर्ल्डकप नेमबाजी स्पर्धेत भारताच्या रियाझ धिल्लो हिनं रौप्य पदक पटकवलं. रियाझनं ६० पैकी ५१ लक्ष्यं साध्य केली. या स्पर्धेत ग्रेट ब्रिटनच्या खेळाडूनं सुवर्णपदक तर जर्मनीच्या ॲनाबेला हिनं कांस्य पदक जिंकलं. महिलांच्या दहा मीटर एअर पिस्तोल प्रकारात कनक हिनं सुवर्ण तर पुरुषांच्या ५० मीटर रायफल प्रोन प्रकारात एड्रियन कर्माकर यानं रौप्य पदक मिळवलं आहे. दरम्यान, स्पर्धेत भारतानं एक सुवर्ण, दोन रौप्य पदक मिळवत पदक तालिकेत अव्वल स्थान मिळवलं आहे.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत काल अहमदाबाद इथं झालेल्या सामन्यात लखनौ सुपर जायंट्स संघानं गुजरात टायटन्सवर ३३ धावांनी विजय मिळवला. पहिल्यांदा फलंदाजी करताना लखनौच्या संघानं निर्धारित २० षटकांमध्ये २ गड्यांच्या मोबदल्यात २३५ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल गुजरातच्या संघाला २०२ धावाच करता आल्या. लखनौकडून ११७ धावांची खेळी करणाऱ्या मिशेल मार्शला सामनावीर म्हणून गौरवण्यात आलं.

//<><><><><>//